# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


परीक्षा गोदाम विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१४६२
Website: www.unipune.ac.in

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

Exam Godown
Ganeshkhind Pune 7.
Contact : 020-25621462
e-mail: godown@pun.unipune.ac.in


जा.क्र. पगो/२०२३/२५६ **महत्वाचे व तातडीचे** दि. ३०/१०/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व सलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
(विद्यापीठ परीक्षांचे महाविद्यालयातील केंद्र)

विषय : हिवाळी सत्र परीक्षा नोव्हेंबर/डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात येणा–या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक साहित्याच्या मागणीबाबत.

महोदय/महोदया,

वरील विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षा विभागाने हिवाळी सत्र परीक्षा नोव्हेंबर/डिसेंबर २०२३ पासून आपल्या महाविद्यालयास २०२३ मध्ये होणा–या परीक्षांसाठी आपणांस आवश्यक असलेल्या साहित्याची/स्टेशनरीचे वाटप करण्यात येणार आहे.

विद्यापीठाने प्रथम वर्ष कला, ललितकला, मानसनीती व समाजविज्ञान, वाणिज्य, विज्ञान, विज्ञान (संगणक) व विज्ञान (जैवतंत्रज्ञान) तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. आणि बी.बी.एम. (आय.बी.) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१०–११ पासुन महाविद्यालयाकडे वर्ग केले असल्याचे संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/१६३३, दि. २४ नोव्हेंबर २००९ रोजी कळविलेले आहे. या परीक्षेसाठी लागणारी स्टेशनरी व को–या उत्तरपत्रिका संबंधित महाविद्यालयाने छापून घ्यावयाच्या आहेत. त्या परीक्षाव्यतिरिक्त इतर परीक्षासाठी आवश्यक स्टेशनरीचीच मागणी नोंदविण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयाकडे वर्ग केलेल्या परीक्षेसाठी विद्यापीठाची स्टेशनरी को–या उत्तरपत्रिका वापरण्यात येऊ नये.

उन्हाळी सत्र जून २०२३ मध्ये आपणांस विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वितरित करण्यात आलेल्या स्टेशनरीपैकी काही स्टेशनरी शिल्लक असल्यास त्या स्टेशनरीचा प्रथम हिवाळी सत्र परीक्षा नोव्हेंबर/डिसेंबर २०२३ च्या परीक्षांसाठी उपयोग करण्यात यावा. यापूर्वीची अत्यंत जुनी व जीर्ण झालेली स्टेशनरी वापरण्यात येऊ नये व अशी स्टेशनरी अथवा परीक्षेचे साहित्य आपल्याकडे शिल्लक असल्यास त्यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयाकडे स्वतंत्र पत्रान्वये कळविण्यात यावी म्हणजे ती घेऊन जाण्याची व्यवस्था करता येऊ शकेल. यासबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयास न कळविल्यास सदर साहित्य स्वखर्चाने विद्यापीठाकडे जमा करावे लागेल. याची कृपया नोंद घ्यावी.

हिवाळी सत्र २०२३ मध्ये होणा–या परीक्षा बारकोड नुसार आहेत याची नोंद घेऊन मुख्य उत्तरपत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत. या सर्व उत्तरपत्रिका फक्त विद्यापीठ परीक्षांसाठी वापरण्यात याव्यात व शिल्लक राहिलेल्या उत्तरपत्रिकांची नोंद घेऊन त्या व्यवस्थित पुढील परीक्षांसाठी सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत खराब झालेली उत्तरपत्रिका अथवा अर्धवट वापरलेली उत्तरपत्रिका रद्दी समजून नष्ट करू नयेत. तर त्याची नोंद घेऊन दप्तरी दाखल करावी. कारण आपल्या महाविद्यालयाच्या नावांवर या सर्व उत्तरपत्रिकां स्वीकारल्याची नोंद विद्यापीठ कार्यालयाकडे करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे परीक्षांचे साहित्य महाविद्यालयाच्या ज्या प्रतिनिधीच्या ताब्यात द्यावयाचे आहे त्या प्रतिनिधीचे नांव, मोबाईल नंबर व कार्यालयाचा फोन नंबर या पत्रासोबत कळविल्यास त्यासंबंधी परीक्षेचे साहित्य वितरित करीत असताना संपर्क साधण्यास मदत होईल.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, वरील परीक्षेच्या साहित्याची वितरण खालील प्रमाणे **दि. ०१.११.२०२३** पासून करण्यात येत आहे. ऐनवेळी परीक्षेच्या साहित्याची मागणी केल्यास ती पुरविणे शक्य होणार नाही. व अशा वेळी सदर परीक्षा साहित्य आपणास घेऊन जाण्याची व्यवस्था करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच परीक्षा गोदाम कक्षाने मान्य केलेल्या स्टेशनरी व्यतिरिक्त परीक्षा चालू असताना अतिरिक्त स्टेशनरी लागल्यास ती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येईल. तरी **दि. १०.११.२०२३** पर्यंत या अंतिम तारखे नंतर महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने स्टेशनरीची मागणी न दिल्यास त्यांना स्टेशनरी दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

हिवाळी सत्र २०२३च्या विद्यापीठ परीक्षांच्या प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे गोदाम कक्षात आणून जमा करु नयेत. सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयात परीक्षा कस्टडीमध्ये ठेवावेत. सदर प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांच्या गठ्ठयांची विल्हेवाट लावण्याची तारीख महाविद्यालयांना नंतर कळविली जाईल. त्यावेळी महाविद्यालयांनी संबंधित प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे गोदाम कक्षात आणून जमा करावेत.

तरी महाविद्यालयांनी ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२३ च्या परीक्षेपासून ऑनलाईन स्टेशनरी मागणीपत्र भरताना ऑनलाईन पध्दतीने फॉर्म नुसार माहिती तंतोतंत भरणे आवश्यक आहे, याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्यानुसार तसेच परीक्षांमध्ये अवलंबवयाची सुरक्षितता राजेश अग्रवाल यांच्या शिफारशीनुसार अनुषांगिक शासन निर्णयास अनुसरून सर्व परीक्षांना पुरवणी उत्तरपत्रिका बंद करण्याचे निश्चित झालेले आहे. यास्तव सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते कि त्यांच्याकडील सध्या शिल्लक असलेल्या उत्तरपत्रिका, पुरवणी, सेंटीमीटर ग्राफ, ड्राईंगशीट यांचा पुर्णत: वापर होईल याची दक्षता घ्यावी.**

## ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरण्यासाठी आवश्यक सूचना

१. परीक्षा साहित्य मागविण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरावयाचा आहे.
२. **Examination** मध्ये **Godown : Examination Stationery Requisition online System** ला क्लिक करा.
२. **Online Godown System** ला क्लिक केल्यानंतर **College/Department Login** वर क्लिक करा.
४. **BCUD User Name** आणि **Passwoard** वापरुन **Login** करा.
५. इथे तुम्हाला.**Demand Entry** चे बटन दिसेल, ते क्लिक केल्यानंतर जो फॉर्म ओपन होईल त्यावर विचारलेली सर्व माहिती भरावयाची आहे.
६. ती माहिती **Save** बटन दाबून **Save** करा.

तदनंतर गोदाम विभागाकडून आपल्या मागणीची छाननी करून स्टेशनरी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

परीक्षा आयोजनासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला,

मा.संचालक
(परिक्षा व मूल्यमापन मंडळ)